RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ५, अंक १०८] बुधवार, सप्टेंबर १८, २०१९/भाद्र २७, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २५०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय (विस्तार)
मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ सप्टेंबर २०१९.

**अधिसूचना**

**कीटकनाशके अधिनियम, १९६८.**

क्रमांक सीपीएस-१११९/प्र.क्र.२९७/१७-अ.—ज्याअर्थी, राज्य शासनाचे-(क) यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कीटकनाशकांचा वापर केल्यानंतर अमरावती महसूल विभागातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांमधील मोठ्या प्रमाणावर शेतमजूरांना व शेतकऱ्यांना विषबाधा झाल्याचे उघड झाले असल्याचे कळविण्यात आले आहे ;

(ख) अशा कीटकनाशकांमुळे विषबाधा झाल्याच्या घटना राज्यात, विशेषतः अमरावती महसूल विभागामध्ये पुन्हा उद्‌भवल्या आहेत. या घटनांमध्ये, कीटकनाशकांमुळे झालेल्या विषबाधेच्या उपचारासाठी विविध रुग्णालयांमध्ये माहे एप्रिल २०१९ पासून शेतमजूर व शेतकरी यांना उपचारासाठी दाखल करण्यात आलेले आहेत ;

(ग) ही कीटकनाशके एकतर आत्यंतिक किंवा अति विषारी आहेत, परंतु अनधिकृत रीतीने संमिश्रणासाठी वापर केल्यामुळे त्यांचा अत्यंत विषारी प्रभाव असतो ;

(घ) महाराष्ट्र शासनाने, आपल्या दिनांक २७ मार्च २०१८ च्या प्रस्तावाद्वारे या कीटकनाशकांची विक्री, वितरण किंवा वापर यांवर कायमस्वरुपी बंदी घालण्याची विनंती केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समिती, फरिदाबाद यांना केली आहे. केंद्र सरकार उक्त प्रस्तावाबाबत अजूनही आढावा घेऊन चौकशी करीत आहे;

यांसारख्या कारणांसाठी असे मत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** या कीटनाशकांचे धोकादायक स्वरुप तसेच कीटकनाशकांमुळे विषबाधा होण्याच्या वारंवार घडणाऱ्या घटना विचारात घेता, राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर केंद्र सरकारकडून आढावा घेऊन चौकशी करण्याच्या कालावधीमध्ये, या कीटकनाशकांची यापुढील विक्री, वितरण व वापर करण्यास तातडीने बंदी घालणे गरजेचे आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कीटकनाशकांचा किंवा त्यांच्या कोणत्याही गटांचा किंवा अशा कीटकनाशकांच्या कोणत्याही मिश्रणांचा वापर मनुष्यजातीस किंवा प्राण्यांना धोकादायक असण्याचा संभव आहे ;

**त्याअर्थी, आता,** कीटकनाशके अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४६) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, या प्रकरणातील अन्वेषण पूर्ण होईपर्यंत, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कीटकनाशकांची किंवा त्यांच्या कोणत्याही गटांची किंवा त्यांच्या कोणत्याही मिश्रणांची, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीकरिता अमरावती महसूल विभागातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ जिह्यांमध्ये विक्री, वितरण किंवा वापर करण्यास मनाई करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र.<br>(१) | कीटकनाशकाचे किंवा मिश्रणाचे नाव<br>(२) | वापरण्याच्या सूत्रासह टक्केवारी<br>(३) |
|---|---|---|
| १ | प्रोफेनोफोस ४०% + सीपरमेथ्रीन ४% ईसी | ४०% + ४% ईसी |
| २ | फिप्रोनील ४०% + इमीडॅक्लोप्रीड ४०% डब्ल्युजी | ४०% + ४०% डब्ल्युजी |
| ३ | ऍसिफेट ७५ % एससी | ७५% एससी |
| ४ | डीफेन्थीरोन ५० % डब्लुपी | ५०% डब्लुपी |
| ५ | मोनोक्रोटोफॉस ३६ % एसएल | ३६ % एसएल |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एकनाथ डवले,**
शासनाचे सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBUNDARY, DAIRY DEVELOPMENT AND FISHRIES DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya Annex
Mumbai 400 032. dated the 17th September 2019

*NOTIFICATION*

INSECTICIDES ACT, 1968.

No.CPS-1119/C.R.297/17A.—Whereas, the State Government is of the opinion, for the reasons such as-

(*a*) large number of farm labourers and farmers have been reported to have been exposed to poisoning, after using insecticides specified in the Schedule appended hereto, in Akola, Amaravati, Buldhana,Washim and Yavatmal districts of Amaravati revenue division ;

(*b*) the occurrences of such insecticides poisoning has again arise in the State particularly in Amravati Revenue Division. In these occurrences, farm labourers and farmers are admitted in the various hospitals for the treatment of the insecticides poisoning since the month of April, 2019 ;

(*c*) these insecticides are either extremely or highly toxic, but have highly toxic effect due to use for blending in an unauthorised manner ;

(*d*) the Govrnment of Maharashtra has requested Central Insecticides Board and Registration Committee, Faridabad by its proposal dated the 27th March 2018, to ban these insecticides to distribute, sale or use, permanently. The Central Government is still reviewing and enquiring the said proposal ;

And whereas in view of hazardous nature of these insecticides and repeated occurrences of insecticides poisoning, it is in urgent need to ban for further sale, distribution and use of these insecticides during the period of review and enquiry by the Central Government in the proposal which has been submitted by the State Government ;

And whereas, the use of the insecticides specified in the said Schedule or any batches thereof any combinations of such insecticides is likely to involve risk to human beings or animals ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1)* of section 27 of the Insecticides Act,1968 (46 of 1968), the Government of Maharashtra hereby prohibits the sale, distribution or use of the insecticides or any batches thereof or any combinations thereof, as specified in the Schedule appended hereto in Akola, Amaravati, Buldhana, Washim and Yavatmal districts of Amravati Revenue Division for the period of sixty days, from the date of publication of the notification in the *Official Gazette*, pending investigation into the matter.

*Schedule*

| Sr. No. (1) | Name of the Insecticide or combination (2) | Percentage with Formulation for use (3) |
|---|---|---|
| 1 | Profenophos 40% + Cypermethrin 4% EC | 40%+4% EC |
| 2 | Fipronil 40% + Imidacloprid 40% WG | 40%+40% WG |
| 3 | Acephate 75% SC | 75% SC |
| 4 | Difenthiron 50% WP | 50% WP |
| 5 | Monochrotophos 36% SL | 36% SL |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

EKNATH DAWALE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.